सी.बी.टी प्रकाशन

# सोनालीचा मित्र



BVBK-0402786

SONALICHA MITR (Marathi)

© by CBT 1991

ISBN 81-7011-501-9

चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट, नवी दिल्ली


चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट, नेहरु हाउस, 4 बहादुरशाह ज़फर मार्ग, नवी दिल्ली.द्वारा प्रकाशित व ट्रस्ट च्या
इंद्रप्रस्थ प्रेस नवी दिल्ली मध्यें मुद्रित

# सोनालीचा मित्र

लेखन : अलका शंकर

चित्रांकन : जगदीश जोशी

अनुवाद : विजया चवरे





BVBK-0402786



"का-का" सोनाली बागेत बसून कावळयाला बोलावते आहे. कावळा तिचा मित्रच जसा काही. सोनाली बिस्किट खाते आहे.

सोनाली पहिला शब्द बोलायला शिकली आहे—तो आहे "का-का"

कावळा झाडावर बसला आहे.






त्याने सोनालीचे बोलावणे ऐकले तो उडून जमिनीवर येतो आणि उडया मारत सोनालीजवळ जातो.





सोनाली टाळ्या वाजवून आनंदाने तोंडाने आवाज करू लागते.

"काव-काव", कावळा तिला बोलावतो.



२८८६
बा.वा.

सोनाली हात पसरते.
तिला कावळ्याला हात लावायचा आहे.





पण कावळा हावरट पक्षी आहे. त्याने एकदम उडी मारली आणि आपल्या टोकदार चोचीने सोनालीच्या हातातील बिस्किट हिसकावून घेतले.

नंतर तो उडून गेला.





२८८६

चोरलेले बिस्किट खाण्यासाठी झाडाच्या फांदीवर बसला.



सोनालीला वाईट वाटले. तिचे बिस्किट गेले. कावळाही गेला. तिने रडायला सुरुवात केली.

आई धावतच तिच्याकडे आली. ''सोनू, तू का रडतेस ?'' आईने तिला उचलून घेतले.



आ. क्र. २७८६
विषय ०११.७८


सोनालीने झाडाकडे बोट दाखवून म्हटले, ''का-का''. आणि तिने पुन्हा रडण्यास सुरुवात केली.

''का-का ने तुझे बिस्किट घेतले ? काही हरकत नाही. मी तुला दुसरे देईन,'' आई म्हणाली.

सोनालीला आनंद झाला. तिने बिस्किट खाल्ले. नंतर पुन्हा तिला कावळा दिसला.





BVBK-0402786

"का-का," तिने कावळ्याला बोलावले, तो उडून खाली तिच्याकडे आला. तिला खूप खूप आनंद झाला.

का-का पुन्हा तिचा मित्र झाला.